International Journal for Multidisciplinary Research
International Conference on Multidisciplinary Research & Studies 2023
E-ISSN: 2582-2160 ● Website: www.ijfmr.com ● Email: editor@ijfmr.com
ICMRS'23

# थेरीगाथा आणि आधुनिक मराठी कवितेतील स्त्रीवाद: चिकित्सक अध्ययन

**प्रा. डा. विश्वजीत कांबळे**

सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग, शिवरामजी मोघे महाविद्यालय, केळापूर, (पांढरकवडा) जि. यवतमाळ. 445302.

**सारांश**

आधुनिक मराठी साहित्यामधिल स्त्रीवादाची पानेमुळे सुमारे तीन हजार वर्षांपूर्वी तथागत बुद्धांच्या भिक्खुणी संघातील भिक्खुणींनी निर्माण केलेल्या 'थेरीगाथा' या जागतिक ग्रंथात बघावयास मिळतात. भिक्खुणींनी आपल्या जीवनातील अनुभवांना कथन करून स्त्रीसंवेदनांना व्यक्त करणा-या 'थेरीगाथा' या ग्रंथाची निर्मिती केली. 'थेरीगाथा' हा ग्रंथ म्हणजे स्त्रीजीवनाच्या स्वानुभवांचा पहिला स्वच्छंद उद्गार होय. स्वातंत्र्याची देण ही बुद्धांच्या धम्मातील महत्वाची देण होय. या भिक्खुणींनी 'थेरीगाथा' हा स्त्रीस्वातंत्र्याचा जगप्रसिद्ध ग्रंथ निर्माण केला. 'थेरीगाथा' हा स्त्रीवादी साहित्याचा जगातील पहिला ग्रंथ होय. थेरीगाथाच्या प्रेरणेतून जागतिक स्त्रीवादी साहित्य निर्माण झाले.

'थेरीगाथा' हा ग्रंथ प्राचीन असला तरी यातून आधुनिक युगातील जाणिवां व्यक्त होतांना दिसून येते. स्वातंत्र्याचा स्वच्छंद अनुभव घेणा-या स्त्रियांची 'थेरीगाथा' ही अस्खलित अभिव्यक्ती आहे. मनात निर्माण झालेल्या उदानाची ही अभिव्यक्ती आहे. स्त्रियांच्या वेदना-संवेदनांचे हे आविष्करण आहे. 'थेरीगाथा' स्त्रियांच्या सुख-दुःखाचा जीवनपट आहे. 'थेरीगाथा' मधून व्यक्त झालेल्या स्त्रीसंवेदना आणि स्त्रीवादी जाणिवा आधुनिक मराठी कवितेमधून प्रतिबिंबीत झाल्या आहेत. थेरीगाथा जागतिक स्त्रीवादी साहित्याची प्रेरणा आहे.

थेरीगाथाच्या प्रभावाने आधुनिक मराठी स्त्रीवादी साहित्य विकसित झाले. आधुनिक मराठी स्त्रीवादी कवितेचा विकास थेरीगाथाच्या प्रेरणेतून झाला. थेरीगाथा आधुनिक स्त्रीवादी मराठी साहित्याची प्रेरणा आहे. 'थेरीगाथा' हा ग्रंथ स्त्रीवादी मराठी साहित्यासाठी मूल्यसंस्कृतीच आहे. थेरीगाथा मधून व्यक्त झालेले स्त्रियांचे सुख-दुःख, व्यथा-वेदना, व्यक्त झालेल्या स्त्रीवादी संवेदना ह्या आधुनिक मराठी कवितेचा विषय झाल्या आहेत. थेरीगाथामधून व्यक्त झालेल्या स्त्रीवादी जाणिवा आधुनिक मराठी कवितेतून व्यक्त झाल्या आहेत. आधुनिक स्त्रीवादी मराठी साहित्याच्या अभ्यासासंदर्भाने थेरीगाथाचे अनन्यसाधारण महत्व आहे.

**बीजशब्द** - स्त्रीवाद, थेरीगाथा, स्त्रीसंवेदना, मूल्यसंस्कृती, युगनायीका, परिवर्तन, समता, स्वातंत्र्य, बंधुता.

## प्रस्तावना

1960 नंतरच्या आधुनिक काळातील सामाजिक बदलाचे संदर्भ स्त्रीवादाने पूर्णपणे बदलून टाकले आहे. 1960 नंतर मोहरून आलेल्या आंबेडकरी साहित्याने स्त्रीवादाचे स्वरूप बळकट केले. आणि इथून पुढे स्त्रीवाद मोठ्या प्रमाणात विकसित होत गेला. 1975 च्या पुढे स्त्रीवादाचा विस्तार होत गेला. आता तर भारतीय स्त्रीवादाचे स्वरूप आणखीनच विस्तारित झाले आहे.

आजच्या जागतिकीकरणाच्या आधुनिक युगात स्त्रियांनी गाठलेल्या प्रगतीचा उच्चांक स्त्रीवादाच्या विकासाची पावतीच म्हणावी लागेल. परंतु दुस-या बाजुने विचार केला तर प्रगती करणा-या स्त्रियां बोटावर

मोजण्याइतक्याच आहेत. आणि ज्यांना धड खायला सुद्धा मिळत नाही याचेच प्रामाण जास्त आहे. अशा व्यस्त प्रमाणात स्त्रियांचा विकास हा आजही स्त्रीवादाला पडलेला यक्ष प्रश्न आहे. याचे कारण म्हणजे भारतीय संस्कृतीने स्त्रियांना दिलेल्या अधिकारांसंबंधी जनजागृतीचा अभाव असेही म्हणता येईल. परंतु जे अधिकार आणि हक्क स्त्रियांना दिले आहेत त्यानुसार त्याची अंमलबजावणी होते काय? या प्रश्नाच्या उत्तरात आधुनिक स्त्रीवाद आजही गोल गोल घिरट्या घालताना दिसतो आहे.

जीवनातील अपरिमित दुःख, दारिद्र्या, विषमता व अनेकप्रकारच्या यातनांवर मिळविलेल्या विजयाचा मंगल ध्वनी असे थेरीगाथाचे स्वरूप आहे. थेरीगाथातील गाथा एका नव्या अभिव्यक्तीचा आरंभबिंदू आहे. कविता, कथा, स्वकथन इत्यादी साहित्यप्रकारातून ज्याप्रमाणे अनुभवांना अभिव्यक्त केले जाते. त्याप्रमाणे 'थेरीगाथा' मध्ये अनुभवांची अभिव्यक्ती झालेली आहे. थेरीगाथा काव्यमय आहे. संवादात्मक आहे. स्वकथनपर आहेत. कधी गेयात्मक तर कधी गद्यात्मक स्वरूपाच्या आहेत. अशा प्रकारातून थेरीगाथा अभिव्यक्त झाल्या आहेत. म्हणूनच अभिव्यक्तीच्या दृष्टीने थेरीगाथा अत्यंत महत्वाच्या आहेत. साहित्याचे असे विविध पैलू आणि प्रकार थेरीगाथातून विकसित झाले आहेत. थेरीगाथामधून व्यक्त झालेल्या स्त्रीवादी जाणिवा आधुनिक मराठी कवितेतून कशाप्रकारे व्यक्त झाल्यात याचा अभ्यास होण्याच्या दृष्टीने प्रस्तुत शोधनिबंधात निवडक कवयित्रींच्या कवितांच्या संदर्भाने सविस्तर मांडणी केली आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे**

1) थेरीगाथाचे स्वरूप समजून घेणे.
2) थेरीगाथा या ग्रंथातून व्यक्त झालेल्या स्त्रीवादी जाणिवा आधुनिक मराठी कवितेतून कशाप्रकारे आविष्कृत झाल्या ते अभ्यासने.
3) थेरीगाथा हा ग्रंथ स्त्री स्वातंत्र्याचा उद्घोष आहे हे अभ्यासणे.
4) स्त्रीवादी दृष्टिकोनातून स्त्रियांच्या उन्नती आणि उत्कर्षाबाबत थेरीगाथाचा अभ्यास होणे.
5) थेरीगाथा मानवी जीवनमूल्ये रूजविणारा स्त्रीवादी ग्रंथ असल्याचे अभ्यासणे.

**गृहीतकृत्ये**

1) थेरीगाथा हा ग्रंथ स्त्री स्वातंत्र्याचा आद्य हुंकार असल्याचे लक्षात येते.
2) स्त्रियांच्या उन्नती आणि उत्कर्षाबाबत आजही थेरीगाथेचे महत्व असल्याचे लक्षात येते.
3) थेरीगाथेतील स्त्रियांचे सामाजिक जीवन आदर्ष असल्याचे दिसून येते.
4) थेरीगाथा सामाजिक समतेचा पुरस्कार करताना दिसून येते.
5) थेरीगाथामधून व्यक्त झालेल्या स्त्रीवादी जाणिवा आधुनिक मराठी कवितेतून आविष्कृत होताना दिसून येतात.

**तथ्यसंकलन**

प्रस्तुत शोधनिबंधाकरिता लिखित साहित्याच्या आधारे तथ्यसंकलन केले आहे.

**स्त्रीवाद संकल्पना**

स्त्रीवाद संकल्पनेचा जन्मच 'थेरीगाथा' मधून झाला. स्त्रीवादी संकल्पनेचा उदय मानवजातीच्या इतिहासातील एक क्रांतीकारी पाऊल होय. तथागत बुद्धांनी सर्वप्रथम स्त्रियांना स्वातंत्र्य बहाल केले. त्यानंतर महात्मा जोतीबा फुले आणि युगनायक भारतरत्न डा. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्त्रियांच्या उद्धारासाठी धोरणात्मक कार्य केले. आपल्यावरील होत असलेल्या अन्यायाच्या विरूद्ध ज्या क्षणी स्त्रीने बंड पुकारला तो क्षण स्त्रीवादाचा उगम आहे. परंतु आपण दुस-या पद्धतीने विचार केल्यास स्त्रीवाद स्त्रियांच्या मनातील भावविश्व आहे. स्त्रीवाद ही अभिव्यक्त होण्याची नवी संकल्पना आहे. स्त्रीवाद हा विचारांचा ठेवा आहे. स्त्रीवाद ही स्त्रियांच्या कलेला वाव देणारी आणि तिच्यातील कला-गुणांचा विकास घडवून आणणारी संकल्पना आहे. तिच्यातील प्रतिभेला जगासमोर उलगडून दाखविण्याची एक संधी या भूमिकेतून स्त्रीवाद संकल्पना विकास पावली आहे.

स्त्रीवादाने स्त्रियांना पारंपारिक विचारातून बाहेर काढून नवा परिवर्तनशील विचार दिला आहे. अन्याय, अत्याचार, शोषण ह्या परवलीच्या बाहेर जावून स्त्रियांनी आपली भूमिका सिद्ध केली आहे. प्राचीन काळी स्त्रियांना वेगळया पद्धतीची वागणूक दिली जात होती. स्त्रियांना वेगवेगळ्या पद्धतीने एकप्रकारे बळी देण्याची प्रथा होती. सती जाणे हा त्यातीलच एक भाग होय. देवदासी हाही त्यातलाच एक प्रकार होय. केशवपण सुद्धा त्यातीलच प्रकार होय. अशा विषमतावादी विचारसरणीतून स्त्रीवाद संकल्पना उदयास आली. प्राचीन काळचा विचार केल्यास प्राचीन काळी स्त्रियांची स्थिती अतिशय दयनीय होती. याची बरीच उदाहरणं आपणास बघावयास मिळतात.

तथागत बुद्धांच्या समतावादी विचाराने अन्यायकारक विषमतावादी परंपरेला छेद देणारी विज्ञाननिष्ठ विचारसरणी धम्माच्या रूपाने प्रतिष्ठीत झाली. ज्या काळात स्त्रियांना स्वातंत्र्य नव्हते. स्त्रियांना गुलामीचे जीवन जगावे लागत होते. अशा काळात तथागत बुद्धांनी स्त्रियांना धम्मात स्थान देऊन भिक्खुणी संघ स्थापन केला. आणि स्त्री-पुरूष समानतेसह स्त्रियांना स्वातंत्र्य बहाल केले. या धम्मविचारातील भिक्खुणींनी आपले जीवनानुभव 'थेरीगाथा' या ग्रंथांतून व्यक्त केले. 'थेरीगाथा' हा ग्रंथ स्त्रीवादाचा आरंभबिंदू होय.

**थेरीगाथाचे स्वरूप**

बौद्ध साहित्य 'त्रिपिटक' नावाने जगप्रसिद्ध आहे. त्रिपिटकात सुत्तपिटक, विनयपिटक आणि अभिधम्मपिटक हे तीन प्रमुख ग्रंथ आहेत. हे तीन ग्रंथ त्यात असल्यामुळे त्याला 'त्रिपिटक' म्हणतात. त्रिपिटकात तथागत बुद्धाच्या धम्मतत्वचिंतनाचे संकलन आहे. त्रिपिटकात प्राचीन भारताच्या इतिहासाचे वास्तव चित्रण बघावयास मिळते. मानवाला आदर्श जीवन जगण्यासाठीचे तत्वचिंतन बौद्ध साहित्यातून आविष्कृत झाले आहे. 'थेरीगाथा' त्याचेच प्रतिबिंबन आहे. 'थेरीगाथा' हा सुत्तपिटकातील खुद्दकनिकाय मधील ग्रंथ आहे. खुद्दकनिकायात एकूण पंधरा ग्रंथ आहेत. 'थेरीगाथा' हा नवव्या क्रमांकाचा ग्रंथ आहे.
'थेरीगाथा' या ग्रंथात अर्हतपद प्राप्त केलेल्या अर्थात विद्वान असलेल्या 73 भिक्खुणींच्या 522 गाथा आहेत. त्या सोळा निपातात (भागात) विभागल्या आहेत. विमुक्त सुखाच्या परमोच्च आनंदाने त्यांच्या तोंडून अगदी तरलतेने निघालेले ते उदान आहे. आपल्या अनुभवांना स्वच्छंदपणे अभिव्यक्त करणा-या महिलांचे ते स्वकथन आहे. थेरीगाथा एक सुंदर बौद्ध संस्कार आहे, बौद्ध संस्कृती आहे. जीवनातील अपरिमित दुःख, दारिद्र्या, विषमता व अनेकप्रकारच्या यातनांवर मिळविलेल्या विजयाचा मंगल ध्वनी असे थेरीगाथाचे स्वरूप आहे.

**थेरीगाथातून व्यक्त झालेला स्त्रीवाद**

जगामध्ये अनेक प्रकारच्या संस्कृती आहेत. जगातील या विविध संस्कृतीमध्ये स्त्रियांना वेगवेगळे स्थान आहे. काही संस्कृतीमध्ये स्त्रीला देवीसमान मानून तिला समाजामध्ये आदराचे स्थान दिले जाते. तर काही संस्कृतीमध्ये चेटकीण मानून तिला छळल्या जाते. तिची पिळवणूक केली जाते. म्हणूनच स्त्रीवाद्यांचे असे म्हणने आहे की, ''स्त्रीला देवी मानू नका किंवा चेटकीन ही म्हणू नका, तिच्याकडे मनुष्य म्हणून बघा आणि त्यानुसार तिच्याशी वागा.''[1] या मानवतावादी दृष्टिकोनातून आपण स्त्रियांकडे बघितले पाहिजे. स्त्रियांना 'माणूस' म्हणून सन्मानित करणारा विचार 'थेरीगाथा' मध्ये बघावयास मिळतो. तथागत बुद्धांनी स्त्रियांना भिक्खूणी संघामध्ये सामील करून त्यांना निर्वाण प्राप्त करण्याचे स्वातंत्र्य दिले. ही मानवतावादी भूमिका थेरीगाथामधील अनेक थेरींच्या गाथामधून व्यक्त झालेली आहे. यामधून स्त्रीवादी साहित्याला नवी प्रेरणा मिळाली आहे.

'थेरीगाथा' हा ग्रंथ बौद्ध साहित्यातील स्त्रीवादाचा अत्यंत महत्वपूर्ण ग्रंथ आहे. थेरीगाथाने स्त्रियांना अत्यंत सन्मानाची आणि स्वातंत्र्याची जाण करून दिली आहे. आजपर्यंत असलेले स्त्रियांचे गुलामिचे जीवन थेरीगाथाने स्वतंत्र केले आहे. स्त्रीमनातील भाव-भावनांची उत्तम अशी अभिव्यक्ती म्हणजे 'थेरीगाथा' असे सुंदर स्वरूप थेरीगाथामधून प्रतिबिंबीत झाले आहे. स्त्रियांना कितीही दुःख भोगून शेवटी जीवन कंटाळवाने होऊन जीवनाची अधोगती व्हावी ही स्थिती थेरीगाथाने बदलली आहे. आजपर्यंत परंपरेच्या रूढी, अंधश्रद्धेच्या वणव्यात पेटणा-या स्त्रियांना थेरीगाथाने स्वाभिमानाची जाणीव करून दिली. या जाणिवेतून आज स्त्रियांचे

International Journal for Multidisciplinary Research
International Conference on Multidisciplinary Research & Studies 2023
E-ISSN: 2582-2160 ● Website: www.ijfmr.com ● Email: editor@ijfmr.com
ICMRS'23

जीवन उन्नतीच्या मार्गावर दिसत आहे. स्त्रियांना समाजामध्ये सन्मानाने आणि स्वाभिमानाने जगण्याची प्रेरणा थेरीगाथा मधून मिळते. आजच्या आधुनिक स्त्रीवादाच्या दृष्टीने थेरीगाथाचा विचार करता स्त्रीवादी साहित्याची बीजं थेरीगाथातून अंकुरलेली दिसतात. अर्थात स्त्रीवादाचा आरंभच थेरीगाथापासून होतो.

महाप्रजापती गौतमी, धम्मदिना, विशाखा, उब्बिरी, आम्रपाली, पटाचारा, सोमा सुजाता, खेमा, चाला, उप्पलवण्णा, सुमेधा, भद्दकच्चयना, रोहिणी, विमला, इसिदासी, नंदुत्तरा, कुंडलकेसी, थेरीगाथतील अशा अनेक युगनायीकांनी थेरीगाथातून स्त्रीवादी जाणिवांना व्यक्त केले आहे.

**पाश्चात्य स्त्रीवाद**

पाश्चात्य स्त्रीवाद थेरीगाथाच्या प्रेरणेतून जन्मास आला आहे. मरी बुलस्टेन क्राफ्ट या लेखीकेचे 'Avindication of Right of Women' हा 1792 ला प्रसिद्ध झालेला ग्रंथ स्त्रीवादाची भूमिका स्पष्ट करणारा आहे. 1929 मध्ये व्हर्जिनिया वुल्फ यांचा 'A Room of One's Own' हा ग्रंथ प्रसिद्ध झाला. या ग्रंथाने स्त्रीवादाला चालना मिळाली. 1979 मध्ये सिमान द वोल्हा यांचा 'The Second Sex' हा ग्रंथ प्रकाशित झाला. या ग्रंथाने स्त्रीवादाची संपूर्णपणे उकलच केली आहे. नंतर 1969 मध्ये प्रसिद्ध झालेल्या जान स्टुअर्ट मिल यांच्या 'The Subjection of Women' हा ग्रंथ, हेलेन सिक्सस यांचा 'Des- Femmes' हा ग्रंथ, जर्मेन ग्रिअर यांचा 'The Female Eunuch' हा ग्रंथ, बेटी फ्रिडन यांचा 'Feminine Mystique' हा ग्रंथ इत्यादी अनेक लेखिकांचे ग्रंथ प्रसिद्ध झालेत. अशा अनेक लेखिकांनी पाश्चात्य स्त्रीवाद विषयी आपली मते आणि भूमिका विशद केली आहे. स्त्रियांनी आपल्या स्वाभिमानासाठी लढले पाहीजे अशी अपेक्षा यातून व्यक्त होते.

मेरी वुलस्टोन क्राफ्ट यांनी आपल्या 'Avindication of Rights of Women' या ग्रंथात प्रथमच स्त्रियांच्या स्वातंत्र्याचा विचार मांडला आहे. ''1789 मध्ये फ्रान्सच्या असेंब्लीत संमत झालेले 'मानवी हक्कांचे बिल' व अमेरिकेतील 'बिल आफ राईट्स' यामध्ये सर्व मानवांना हक्क आहेत आणि स्त्रियांना मात्र नाहीत.''[2] ही विषमतावादी विचारधारा म्हणजे स्त्रियांची अधोगतीच करणारी आहे या विरोधात बंड करून मेरी वुलस्टोन क्राफ्ट यांनी पाश्चात्य स्त्रीवादाचे स्वरूप स्पष्ट केले आहे.

**भारतीय स्त्रीवाद**

भारतीय स्त्रीवाद ही संकल्पना आपण संकुचित स्वरूपात न लक्षात घेता तिचा जागतिक पातळीवर विचार करून थेरीगाथाच्या संदर्भाने ही जगातील पहिला उद्गार आहे हे आपणास सांगता येईल. 'स्त्रीवाद' ही स्त्रियांच्या अभ्यासाच्या अभ्यासाची एक शाखा आधुनिक काळात निर्माण झाली आहे. स्त्री सुद्धा समाजातील एक घटक आहे तेव्हा तिला समानतेचा दर्जा दिला पाहिजे या भूमिकेतून आपण विचार करणे आवश्यकतेचे वाटते. हा समतेचा विचार 'थेरीगाथा' मध्ये आहे.

भारतीय स्त्रीवादाचा अभ्यास केला तर स्त्रीवादाचे मूळ हे बौद्ध साहित्यातील 'थेरीगाथा' या ग्रंथामध्ये आढळून येते. भारतामध्ये त्याचा पाहिजे त्या प्रमाणात विकास झाला नाही. तो जाणिवपूर्वक होऊ दिला नाही. त्यामुळे थेरीगाथा बाबत भारतीयांना फारशी माहिती नसावी. बौद्ध साहित्यातील समतावादी संस्कृती पाश्चात्य लोकांनी स्वीकारली. म्हणून स्त्रीवाद आपल्याला पाश्चात्य वाटू लागतो. खरे म्हणजे स्त्रीवाद ही भारतीय संस्कृतीचीच उपज असल्याचे आपण लक्षात घ्यायला हवे. सावित्रीबाई फुले आणि ताराबाई शिंदे यांनी आधुनिक स्त्रीवादाची पायाभरणी केली.

स्त्रीवाद संदर्भात डा. सीमा साखरे म्हणतात, ''स्त्रियांवरील अत्याचार आणि पुरूषप्रधानतेतून निर्माण झालेल्या संमस्यांना उत्तर देण्यासाठी स्त्रीवादी विचार अस्तित्वात आला.''[3] अर्थातच स्त्रियांनी आपल्या स्वातंत्र्याच्या लढाईत आपल्या स्वाभिमानाचा विचार केला आहे. हे स्त्रीवादाचे महत्वाचे रूप आहे असे मला वाटते. स्त्रीवाद ही आपली स्वातंत्र्याची लढाई आहे. असे आपण म्हणतो तेव्हा स्त्रीवादाला नवे संदर्भमूल्य प्राप्त होते. या संदर्भाने स्त्रीवादाला एक नवी झळाळीच मिळाली आहे.

**आधुनिक स्त्रीवादी कविता आणि थेरीगाथा**

International Journal for Multidisciplinary Research
International Conference on Multidisciplinary Research & Studies 2023
E-ISSN: 2582-2160 ● Website: www.ijfmr.com ● Email: editor@ijfmr.com

आधुनिक स्त्रीवादी मराठी कवितेचा विचार करता 1850 च्या नंतरच्या स्त्री शिक्षणाच्या काळात स्त्री जाणिवांना व्यक्त होण्याची एक दिशा मिळाली ती क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या स्त्री शिक्षणाच्या क्रांती मुळेच. इथूनच आधुनिक स्त्रीवादी साहित्याची पायाभरणी झाली.

सामाजिक परिस्थितीने काही स्त्रियांनी स्त्रियांनाच जणू दूर ठेवले की काय अशी काहीशी स्थिती होती. वंचित घटकातील स्त्रियांची अवस्था अतिशय दयनीय होती. परंतू सामान्य कुटुंबातील स्त्रियांची स्थिती फार चांगली होती असेही म्हणता येत नाही, कारण अशा वर्गातील लेखिका, कवयित्री यांची दखल कोणीही घेत नव्हते. सावित्रीबाई फुले, ताराबाई शिंदे यांच्या लेखनाची समाजाने फारशी दखलच घेतली नव्हती. तशी ती आजही घेतली जात नाही. परंतू यांचे लेखनच इतके प्रभावशाली आहे की, समाजाला नाइलाजाने त्यांच्या साहित्याची दखल घ्यावीच लागली.

सावित्रीबाई फुले आणि ताराबाई शिंदे या युगनायिकांनी निर्माण केलेल्या साहित्याकडे दुर्लक्ष करून व्यवस्थेचे तळवे चाटणा-या लोकांना आणि त्यांच्या साहित्याला प्राधान्याने घेतले हे ही वस्तूस्थिती संपूर्ण जगासमोर उघडीच आहे. हे आपण सर्वजन जाणतोच आहे. या संदर्भाची पुष्टी करताना अरूणा ढेरे म्हणतात, ''इतिहासकारांनी बहिणाबाई चैधरी, लक्ष्मीबाई टिळक किंवा मनोरमाबाई रानडे यांसारख्या चारसहा कवयित्रींचा जुजबी विचार आणि इतर काही नामोल्लेख यांपलीकडे स्त्रियांच्या निर्मितीकडे फारसे लक्षही पुरवलेले नाही.''[4] यावरून या विषमतावादी समाजव्यवस्थेने वंचित घटकांतील स्त्रियांना कशाप्रकारची वागणूक दिली हे स्पष्ट होते. क्रांतीनायिका सावित्रीबाई फुले आणि ताराबाई शिंदे या नायिकांचे साहित्य आधुनिक मराठी साहित्यामध्ये दिशादर्षक आहे हे आपण मान्यच केले पाहिजे.

**सावित्रीबाई फुले**

आधुनिक कवितेचे सर्वच गुणवैशिष्ट्यो सावित्रीबाईं फुले यांच्या 'काव्यफुले' या कवितासंग्रहातून सर्वप्रथम बघावयास मिळतात. स्त्रीवादी जाणिवा सुद्धा काव्यफुलेमधून बघावयास मिळतात. स्त्रियांच्या अंतर्मनाचा वेध आणि तिची भावना, तिची व्यथा-वेदना सुद्धा काव्यफुले मधून बघावयास मिळते. सावित्रीबाईंची कविता प्रथमतः सामाजिक भान व्यक्त करणारी कविता आहे. 'तयास मानव म्हणावे का' ही सावित्रीबाईंची प्रसिध्द कविता आहे. ही कविता म्हणजे मानवी प्रवृत्ती विशयीचे सावित्रीबाईंचे चिंतनच आहे. माणूसपणाची भूमिका मांडताना सावित्रीबाई अगदी अलगदपणे स्त्री दुःखाच्या जाणिवेचा वेध घेतात.

स्त्री शिक्षणाच्या संदर्भात सावित्रीबाईंची कविता गावागावांतून शिक्षणाचा जागर करीत फिरताना दिसते. कधी ती शूद्रांच्या गल्लीबोळातून जाते तर कधी मुलींच्या खेळण्या-बागडण्याच्या मैदानातून धावताना दिसते. तसेच सावित्रीबाईंचे मुलींनी म्हणायचे एक सामुदायिक गीत आहे. या गीतातून त्यांनी 'शाळेत जाऊ चला गं चला' असे आवाहन केले आहे. या गीतातील कणखर आई म्हणते,

> अभिमानाने जगण्यासाठी शिकून घ्या, जा शाळेला जा
> मनुष्याचा खरा दागिना शिक्षण आहे, घ्या चला
> जा शाळेला, जा शाळेला
> काम पहिलं षिकायचं आहे, दुसरं काम खेळ खेळा
> जमेल तेव्हा झाडणं पुसणं हात लावा घरकामाला
> जा आधी शाळेला जा [5]

सवित्रीबाईंची ही गीतपर रचना स्त्री शिक्षणाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची आणि परिणामकारक आहे. सावित्रीबाईंनी मुलींना शिक्षण देण्यासाठी स्वतः किती त्रास सहन करावा लागला या त्रासाने सावित्रीबाईंच्या स्त्री शिक्षण कार्याच्या इतिहासाची पाने सुवर्ण झाली आहेत. स्त्रियांनी शिकलं पाहिजे. मुलींनी शाळेत आलं पाहिजे म्हणून सावित्रीबाई धडपडताना दिसतात. त्यांच्या काळजातील स्त्री जाणीव संपूर्ण स्त्रीवर्गाला नवी उमेद देणारी आहे हे यावरून लक्षात येते.

आधुनिक मराठी कवितेमध्ये ज्याप्रमाणे स्त्री शिक्षणाला महत्व देवून स्त्रियांनी आपल्यावरील अन्याय-अत्याचारा विरूद्ध बंड करावा आणि आपला स्वाभिमान जागवावा ही अपेक्षा व्यक्त केली आहे. थेरीगाथा सुद्धा शिक्षणाचे महत्व विषद करते. थेरीगाथा स्त्री शिक्षणाचे महत्व सांगते. स्त्रियांनी शिकून आपल्या जीवनातील अंधकार दूर करावा हा संदेष थेरीगाथातील थेरींनी आपल्या गाथांमधून दिला आहे. शिक्षणाचे हे सुत्र थेरीगाथातील थेरींनी सुद्धा कथन केले आहे. थेरीगाथातील मुत्ता, पुण्णा आणि तिस्सा पहिली या थेरींनी शिक्षणाच्या कारणाने प्रव्रजा घेतली आहे. तथागत बुद्धांच्या धम्मातील ज्ञान प्राप्त करून आमचे जीवन धन्य झाले आहे.

कपिलवस्तूमध्ये शाक्य कुळात तिस्सा पहिली हिचा जन्म झाला होता. महाप्रजापती गौतमीकडून प्रव्रजा घेऊन निर्वाण साधन्याचा प्रयत्न करू लागली होती. स्त्रियांच्या संदर्भातील परंपरागत सर्व रूढी बंधनांना तोडून टाकले होते. डा. विमलकीर्ति म्हणतात, ''उसने वर्ण, जातिभेद तथा नारित्व के परंपरागत सभी बंधनो को तोड दिया था।' [6]

अर्थात तिस्सा थेरीने जातीबंधने तोडून स्त्रियांना न्याय मिळवून देण्यात मोलाचे कार्य केले आहे हे समजून येते. तिस्साथेरीने पुण्णाथेरीप्रमाणे बुद्धांची गाथा ऐकली आणि ती वारंवार म्हणू लागली बुद्धाने मूल्यशिक्षणाचा संदेश देणारी गाथा म्हटली ही गाथा तिस्साथेरीच्या नावाने आहे.

तिस्से सिक्खस्सु सिक्खाय, मा तं योगा उपच्चगुं।
सब्बयोगविसंयुता, चर लोके अनासवा' ति।। 4।।[7]

अर्थात तिस्से तू शिक्षण घे, शिक्षणाचा प्रयत्न सोडू नकोस. सर्व बंधानापासून विमुक्त होऊन निर्मळ चित्ताने जगात विचरण कर. हा उपदेश अर्थात ही गाथा शिक्षणाचं महत्व विशद करते. सोबतच शुद्ध आचरणाचा धडा सुद्धा शिकवताना दिसते.

सावित्रीबाई फुले यांच्या कवितेने स्त्रीवादी कवितेला आधुनिक युगात क्रांतीच्या वाटेवर आणून ठेवले. असे आपल्याला म्हणता येईल. सावित्रीबाईंची कविता परिवर्तनाचे मूल्यसिद्धांत मांडत स्त्रियांना आपल्या जीवनाची स्वाभिमानाची आणि अस्मितेची व अस्तित्वाची ओळख करून देणारी आहे.

**बहिणाबाई चैधरी**

बहिणाबाई चैधरी यांची कविता स्त्रीवादीचे अनेक पैलू उलगडणारी आहे. ग्रामीण जीवनातील स्त्री जीवनापासून तर नागरी स्त्रीजीवनातील अनेक पैलूंना बहिणबाईंनी आपल्या कवितेतून व्यक्त केले आहे. शेत, शेतकरी आणि ग्रामीण जीवन हा मुख्य विषय बहिणाबाईंच्या कवितेतून व्यक्त होतो. बहिणाबाईंची कविता स्त्रियांच्या सुख-दुःखांना अतिशय संयमितपणे व्यक्त करते.

अनेक प्रकारच्या कष्टकरी स्त्रिया, मोलमजुरी करणा-या स्त्रिया, संसाराचा गाडा ओढणा-या स्त्रिया, शेतावर कष्ट उपसणा-या स्त्रिया, माहेरवाशीन, सासूरवाशीन इत्यादी सर्वच स्तरांतील स्त्रियांच्या सुख-दुःखाची नोंद बहिणाबाई अगदी सजगपण घेतात. अशा एका कष्ट उपसणा-या सासूरवाशीन स्त्रीचं दुःख व्यक्त करताना बहिणाबाई चैधरी म्हणतात,

उठ सासूरवाशीन बाई
उठ जानं शेती कामाचा किती घोर
तू गोठ्यामधलं ढोर
...
उठ सासुरवाशीन बाई
सुरू झाली वटवट कातवली वो सासू,
पुस डोयांतले आसू [8]

अशाप्रकारे अतिशय साध्या शब्दांत बहिणाबाई चैधरी सासूरवाशीनबाईचं दुःख व्यक्त करतात.

International Journal for Multidisciplinary Research
International Conference on Multidisciplinary Research & Studies 2023
E-ISSN: 2582-2160 ● Website: www.ijfmr.com ● Email: editor@ijfmr.com

थेरीगाथात सुद्धा अशाप्रकारच्या सासूरवाशीन थेरी आहेत. परंतू त्या थेरी सासूरवासात गुरफट बसत नाही. तर धम्माची कास धरतात आणि आपले जीवन उद्धारतात. अतिषय गरीब कुटुंबात जन्मलेली किसा गौतमी या भिक्खुणीची कथा काहिशी बहिणाबाईंच्या सासूरवाशीन सारखीच आहे. किसा गौतमीच्या जीवनातील कथा आधुनिक युगातील स्त्रीजीवनाशी सुसंगत आहे. सासूरवाशीनच्या एकून जीवनावर प्रकाश टाकणारी आहे. परंतू, तिने बुद्ध धम्मात भिक्खुणी संघामध्ये प्रवेश केल्यानंतर तिच्या जीवनातील आनंदाचे पर्व हा यातील अतिशय महत्वाचा भाग आहे.

आपण स्त्रियांनी शोषित न राहता स्वातंत्र्याच्या आणि समतेच्या विचाराने जीवनात आनंद मिळवू शकतो हा संदेष यातून घेण्यासारखा आहे. आधुनिक स्त्री आता क्रांतीच्या दिशेने पाऊल उचलते आहे हे याचेच प्रतिक म्हणता येईल. आपल्या जीवनातील प्रसंग सांगताना किसा गौमती म्हणते –

दुक्खो इत्थिभावो, अक्खातो पुरिसदम्मसारथिना।
सपत्तिकम्यि हि दुक्खं, अप्पेकच्च्चा सकिं विजातायो।। 216।।[9]

अर्थात जे असे म्हणतात की, 'स्त्रीजन्म दुःखदायक आहे.' असे मानणा–या माणसाच्या चित्ताला तथागतांनी संयमित केले आहे. सवतीसोबत घरात राहणे दुःखकारक आहे. आणि प्रसुत झालेल्या स्त्रियांना सुद्धा दुःख आहे. अशाप्रकारे बुद्धांनी स्त्रियांचा जन्म दुःखकारक आहे असे म्हणणा–यांना उपदेष केला आहे. स्त्रियांचे जीवन दुःखकारक नाही तर तसे मानणारी माणसाची प्रवृत्ती दुःखकारक आहे असे यातून स्पष्ट होते आणि तथागत बुद्ध स्त्रियांचा सन्मान करणारे आहेत हे सुद्धा यातून सिद्ध होते.

**ज्योती लांजेवार**

आधुनिक मराठी कवितेमध्ये स्त्रीवादी दृष्टिकोनातून नव्याने पायाभरणी करणा–या कवयित्री म्हणजे ज्योती लांजेवार. यांनी आधुनिक युगातील स्त्री समस्यांचे वास्तविक अशी मांडणी केली आहे. स्त्री जाणिवेला अभिव्यक्त करताना स्त्रियांच्या अंतर्मनाचा अचूक वेध त्यांनी घेतला आहे. ज्योती लांजेवार यांची कविता सरळ वेदनेला हात घालते. ती संवेदन जाणिवेने अभिव्यक्त होते. विषमतावादी व्यवस्थेवर आणि रूढी परंपरावर त्या ताशेरे ओढतात. त्यांची कविता सनातन परंपरेविरूद्ध बंड पुकारते आणि स्त्रियांना सन्मान मिळवून देण्यासाठी पराकाष्ठेची धडपड करते. स्त्रियांचा आदर करणारी समाजप्रवृत्ती जोपर्यंत निर्माण होत नाही तोपर्यंत स्त्रियांचे हरण होतच राहिल अशाप्रकारची भूमिका त्या व्यक्त करतात.

वाटतं हातात घ्यावं कोलीत
अन लावावी आग
या अमानुष्यांच्या वस्तीला
तिथं आपल्या सर्वस्वाची होळी झाली.[10]

स्त्रियांच्या दुःखाप्रतीची संवेदन जाणीव यातून व्यक्त होते आणि स्त्रियांच्या अमानुषपणे छळ करणा–या अमानवीय वस्तीलाच पेटवून देऊन यातून मुक्त व्हावे अशाप्रकारे विद्रोह करून स्त्रियांच्या दुःखाची तिव्रता त्यांनी यातून मांडलेली आहे. अस्पृश्य आणि स्त्री अशा दोन पातळ्यावरील स्त्रियांची होणारी कुचंबना ज्योती लांजेवार प्रभाविपणे व्यक्त करतात. विषमतावादी समाजव्यवस्था, अंधश्रद्धा, रूढी, परंपरा, पुरूषप्रधान संस्कृती अशा बंधनांतून स्त्रियांना मुक्त होण्यासाठी ज्योती लांजेवार अशाप्रकारचा विद्रोह करतात. आणि स्त्री जीवनात परिवर्तनाचा जागर करतात.

थेरीगाथामध्ये काही थेरींनी अशाप्रकारचा विद्रोह करून, बंड पुकारून स्त्रियांच्या दुःखमुक्तीसाठी एक प्रकारचा लढा उभारला होता. अशा भिक्खुणींनी तत्कालीन समाजव्यवस्थेला कंटाळून वैदिक परंपरेला कंटाळून ब्राम्हणवादाला कंटाळून, रूढी–परंपरेच्या बंधनाला कंटाळून भिक्खुणी होण्याचा मार्ग निवडला होता. आणि याव्दारे स्त्रीमुक्तीसाठी त्यांनी प्रयत्न चालविले होते. हे आपण लक्षात घेतले पाहिजे.

भद्दाकापिलानी ही सागल नगरीतील कोसिकगोत्रिय ब्राम्हण कुळातील होती. मगधमधील महातीर्थ गावातील पिप्पलीकुमार सोबत भद्दाकापिलानीचा विवाह झाला होता. पिप्पलीकुमार आणि भद्दाकापिलानी या

दोघांचीही तथागतांच्या धम्मावर श्रद्धा होती. बुद्धांच्या विचारांनी ते प्रभावित होते. एके दिवशी दोघांनीही घर सोडून प्रव्रजित होण्याचा निर्वान घेतला आणि आचार विचार करून घर सोडून प्रव्रज्या घेतली. पिप्पली हा तथागतांच्या भिक्खु संघात प्रमुख होता. पिप्पलीचा तो महाकाष्यप झाला होता. भद्दाकापिलाने सुद्धा अर्हतपद प्राप्त केले होते. आपल्या जीवनातील अनुभवांना कथन करताना भद्दाकापिलानी म्हणते,

दिस्वा आदीनवं लोके, उभो पब्बजिता मयं।
त्यम्ह खीणासवा दन्ता, सीतिभूतम्ह निब्बुता' ' ति।। 66।।[11]

अर्थात भद्दाकापिलानी म्हणते की, सांसारिक जीवनातील दोष, दुःख आणि दुष्परिणाम पाहून आम्ही दोघेही प्रव्रजित झालो आणि सांसारिक जीवनाचा त्याग केला. आज आम्ही दोघेही अनासक्त आहोत. सर्व प्रकारच्या अकुशल विचारांपासून मुक्त आहोत. निब्बाण सुखाचा आणि शांतीचा आम्ही अनुभव घेत आहोत.

या भूमिकेतून ज्योती लांजेवार आपल्या कवितेतून ही विद्रोहाची मषाल षिलगवताना दिसतात. अशाप्रकारे आधुनिक मराठी स्त्रीवादी साहित्यामध्ये थेरीगाथामधील स्त्री जाणीवांचे प्रतिबिंब आपल्याला बघावयास मिळतात.

**अनुराधा पाटील**

आधुनिक मराठी कवितेच्या क्षेत्रात स्त्रीवादी भूमिका मांडणा-या अनुराधा पाटील या एक महत्वाच्या कवयित्री आहेत. स्त्रीमनाचे भावविष्व साकारणारी कविता अनुराधा पाटील यांनी लिहिली आहे. स्त्रियांच्या शोकात्म जीवनाचे चित्रण त्यांच्या कवितांमधून बघावयास मिळते. अन्याय, दारिद्र्या, शोषण आणि संवेदनशीलता व्यक्त करीत परिवर्तनाच्या दिशेने पाऊल टाकताना दिसून येते. पुरूषप्रधान संस्कृती आणि विषमतावादी व्यवस्थेने स्त्रियांना आजही एकप्रकारे गुलामगिरीच्या चक्रव्युहात बांधून ठेवले आहे. अशी खंत या व्यक्त करतात. अशा विषमतावादी समाजव्यवस्थेला पालथी पाडून नवी समातावादी समाजव्यवस्था निर्माण करण्यासाठी त्यांनी संपूर्ण स्त्रियांना एकप्रकारे आवाहन करताना अनुराधा पाटील म्हणतात,

मला नको आहे
तुझं अबर बुक्क्याचं पंढरपूर
नको आहे, जन्मोजन्मी पडणारा, मुक्तीचा श्रीरंगचकवा...
...फक्त वसव तुझ्या उदार हातांनी
मिट्टू दे थोडीशी रखरख, जन्मापासूनच तू सोबत दिलेली [12]

रूढीप्रिय विषमतावादी समाजव्यवस्थेने स्त्रियांची जी अवहेलना केली. तिला जे दुःख भोगावं लागलं त्या दुःखाच्या प्रती तिव्र चिड अनुराधा पाटील यातून व्यक्त करताना इथल्या पाखंडी समाज व्यवस्थे विरूद्धचा हा एकप्रकारचा बंडच आहे असे वाटते. या दुःखातून स्त्रियांनी मुक्त होण्यासाठी झटले पाहिजे अशी अपेक्षा या सारख्या अनुराधा पाटील व्यक्त करतात.

थेरीगाथातील थेरींनी स्त्रीमुक्तीसाठी ज्याप्रमाणे बंड पुकारला आणि संपूर्ण स्त्री जीवनाला जगण्याचा नवा धम्ममार्ग दाखविला त्याप्रमाणे अनुराधा पाटील आपल्या कवितेतून स्त्रीमुक्तीसाठी परिवर्तनाचा नवा विचार मांडताना दिसतात. आधुनिक मराठी साहित्यामधील स्त्रीवादी जाणिवा या थेरीगाथा प्रमाणे आहेत हे यावरून लक्षात येते.

उत्तराने पटाचारा भिक्खुणीच्या उपदेषाने भिक्खुणी संघात प्रवेष घेतला. उत्तमा मनषांतीसाठी सतत इकडे तिकडे भटकत होती. भिक्खुणीसंघात जाऊन तिने आपल्या मनाला षांत केले आणि ज्ञानाची प्राप्ती केली. आता जीवनानुभव कथन करताना उत्तरा म्हणते-

चतुक्खत्तुं प॰चक्खत्तुं, विहारा उपनिक्खमिं।
अलध्दा चेतसो सन्तिं, चित्ते अवसवत्तिनी।। 42।।
सा भिक्खुनिं उपगच्छिं, या मे सद्धायिका अहु।
सा मे धम्ममदे सेसि, खन्धायतनधातुयो।। 43।।[13]

अर्थात उत्तरा म्हणते की, मी चित्तशांती प्राप्त करण्यासाठी आणि अशांत मनाला शांत करण्यासाठी चार-पाच वेळा विहारातून निघाले परंतू मी चित्ताला शांत करू शकले नाही. मी इकडे-तिकड बाहेर भटकत राहिली. नंतर मात्र माझी ज्या भिक्खुणीवर श्रद्धा होती तिच्याकडे गेली. त्या (पटाचारा) भिक्खुणीने मला धम्मोपदेष दिला. स्कन्ध, आयतन आणि धातू याविषयीचे ज्ञान दिले.

अशाप्रकारे उत्तमा थेरी आपल्या जीवनातील अनुभव मांडते. हा तिचा अनुभव व तत्कालीन स्त्री जीवनाला स्त्री मुक्तीचा संदेश देणारा होता. ती अनुभूती अनुराधा पाटील यांच्या कवितेतून आजही आधुनिक युगात होताना दिसते. आधुनिक स्त्रीवादाच्या वेदना संवेदनांना थेरीगाथामधून अभिव्यक्त झाल्या आहेत हे यावरून स्पष्ट होते.

**अरूणा ढेरे**

आधुनिक मराठी कवितेमध्ये स्त्रीवादी भूमिका अधिक स्पष्टपणे मांडणा-या कवयित्री म्हणून अरूणा ढेरे यांचे नाव घेतले जाते. स्त्री जीवनातील सुख-दुःखाचा आलेखच अरूणा ढेरे यांची कविता साकारताना दिसते. स्त्रियांच्या अंतर्मनातील भावस्पंदन आणि स्त्री जाणिवा या भूमिकांना घेऊन त्यांची कविता स्त्रियांच्या भाव-भावना अभिव्यक्त करते. स्त्री-पुरूष नात्यातील अनुबंधनाचे भावस्पर्षी वर्णनही काही कवितांमधून त्यांनी केले आहे. स्त्री जीवनाच्या दुःखाचा पटच त्यांनी 'बायका' कवितेतून मांडला आहे. अरूणा ढेरे म्हणतात,

भर माध्यान्ही
नदीवर खळबळून जातात,
चुबकून निघतात धुण्यागत बायका,
सुस्कारा टाकून पदरानं चेहरा पुसून घेतात
...आल्या दुःखाचे पिहे होऊन घराकडे परतून येतात...
चुलीतल्या जाळाबरोबर
मग धगधगून उठतात बायका, तांबड्याबुंद होत जातात [14]

या कवितेतून अरूणा ढेरे यांनी संपूर्ण स्त्रीजीवनाच्या दुःखाचा अतिशय बारकाईने आणि संयमीतपणे उलगडा केला आहे. स्त्री जन्माची कष्टकरी कथाच यातून त्यांनी मांडलेली आहे. पुरूष प्रधान संस्कृतीत स्त्रियांच्या वाट्याला आलेल्या कष्टमय दुःखाचा हा प्रवास आहे असे मला म्हणावेसे वाटते. स्त्रियांच्या कष्टमय जीवनाचा प्रवास थेरीगाथापासून आजच्या आधुनिक युगापर्यंत येवून पोहचला आहे. थेरीगाथामधून सुद्धा अशा कष्टकरी स्त्रीजीवनाचे चित्रण आले आहे.

सुमंगलमाता, सीहा, रोहिणी, सुभाकम्माराधी या भिक्खुणींचा जीवनप्रवास असाच दुःखदायक आहे. या भिक्खुणी गरीब आणि श्रीमंत कुटुंबातील आहेत. परंतू यांचे दुःख हे समाजव्यवस्थेच्य विषमतावादाचे चित्रण साकारणारे आहे.

रोहिणी भिक्खुणी आपल्या जीवनातील अनुभव कथन करते. ती स्वतः प्रव्रजित झाली, आई वडिलांनी तिला बुद्धाबद्दल, धम्माबद्दल, भिक्खुणीबद्दल विचरले तेव्हा रोहिनीने गाथांमधून सांगितले आहे.

चिरस्स वत मं तात, समणानं परिपुच्छसि।
तेसं ते कित्तयिस्सामि, पञ्ञासीलपरक्कमं।। 274।।[15]

अशाप्रकारे भिक्खुणी रोहिणी आपल्या वडिलांना सांगते की, बाबा! तुम्ही अनेकदा मला भिक्खु संघाच्या श्रमणांच्या बाबतीत विचारत आहात. आज मी त्यांच्या बद्दल तुम्हाला सांगते. प्रज्ञा, शील आणि त्यांच्या कामाची तत्परता याविषयी तुम्हाला सांगते. रोहिणीच्या वडिलांनी बुद्धाची, धम्माची आणि संघाची महती ऐकली आणि स्वतः प्रव्रजित होण्याची इच्छा व्यक्त करून प्रव्रजित झाले. या थेरींनी धम्मोपदेषाने दुःखावर मात करून नव्या जीवनाची अनुभूती घेतली आहे. आज स्त्रियांनी यातून बोध घेऊन परिवर्तनाची कास धरणे गरजेचे आहे. असा संदेष यातून आपणास मिळता. हिच भूमिका अरूणा ढेरे आपल्या कवितांमधून व्यक्त करतात. स्त्रियांचे दुःख मांडून त्यांना यातून मुक्त होण्यासाठी खंबीर होण्यासाठी सांगतात. परिवर्तनाचा

मार्ग निवडायला सांगतात. थेरीगाथा आणि आधुनिक मराठी कवितेतील स्त्रीवादाची ही सुसंगतता अशाप्रकारे स्पष्ट होते.

ईत्यादी अनेक कवयित्रिंच्या अधुनिक मराठी कवितांमधून थेरीगाथामध्ये व्यक्त झालेल्या स्त्रीवादी संवेदनांचे अनेक पैलू आविष्कृत झाले आहेत.

सावित्रीबाई फुले, ताराबाई शिंदे, बहिणाबाई चैधरी, लक्ष्मीबाई टिळक, मनोरमाबाई रानडे, डा. रूपा कुलकर्णी, डा. शोभा नाईक, डा. अरूणा ढेरे, डा. सीमा साखरे, डा. ज्योती लांजेवार, हिरा बनसोडे, अश्विनी धोंगडे, प्रज्ञा लोखंडे, प्रीती करमरकर, सुमती लांडे, प्रभा गणोरकर, मल्लिका अमर शेख, नीरजा, शांताबाई कांबळे, डा. राजश्री पवार, उर्मिला पवार, षिल्पा कांबळे, नजुबाई गावित, उषाकिरण आत्राम, कुसुमावती देषपांडे, प्रज्ञा दया पवार, डा. वंदना महाजन, शारदा साठे, मालिनी तुळपुळे, माया पंडित, विद्युत भागवत, निलम गो-हे, रजिय पटेल, तारा भवाळकर, मंगला वरखेडे, डा. पद्मरेखा धनकर, सिसिलिया काव्र्हालो, इत्यादी अनेक कवयित्रींनी आणि लेखिकांनी आधुनिक मराठी साहित्यातील स्त्रीवादाला विकसित केले आहे.

**समारोप**

आज संपूर्ण जगभरातील स्त्रीवादाचा आपण विचार केला तर थेरीगाथाने देशभरातील स्त्रीवादाची निर्मिती केली असे लक्षात येईल. बुद्धाच्या धम्मात गरीब-श्रीमंत, लहान-मोठा, काळा-गोरा असा कोणताच भेद नाही. पटाचारा किंवा महाप्रजापती गौतमी अथवा पटाचाराची षिश्या धम्मदिना यांनी आपल्या प्रचंड ऊर्जेने धम्मप्रसार व प्रचाराची धुरा समर्थपणे पेलून मानवकल्याणाची उज्वल प्रभा समस्त स्त्रियांना प्राप्त करुन दिली. समाजातील सर्व स्तरातील स्त्रियांनी बुद्ध उपदेषाने अंतर्मुख होऊन आपल्या स्वत्वाची जाणीव स्वतः करुन घेतली. या सर्व स्त्रियां प्रचंड स्वाभिमानी आणि निश्ठावान आहेत. स्त्रियांच्या वाट्या◌ाला आलेले भोग बंधने, मर्यादा, निकृष्ट दर्जा या सा-या गोष्टींचे भांडवल न करता धम्माच्या रूपाने दुःख निरोधाचा मार्ग गवसल्यावर त्यांनी अर्हत पदाला प्राप्त करून जीवन समृद्ध केले.

बुद्धाच्या धम्मातील समता मूल्याने स्त्रियांना सुद्धा भिक्खू संघात मानाचे स्थान आहे. बौद्ध धम्मात स्त्रियांना पुरूषापेक्षा उच्च दर्जा दिला आहे. थेरीगाथेद्वारे केवळ जीवनानुभवांचेच चित्रण येते असे नव्हे तर प्राचीन भारतीय समाजातील स्त्रियांच्या स्थितीचा, समाजाचा स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टिकोन या बाबीचेंही वर्णन येते. कारण थेरीगाथा या काल्पनिक नाही. तर लिखित स्वरुपात असल्याने तो ऐतिहासिक दस्ताऐवज आहे. तथागत बुद्धाच्या षिकवणुकीतील समता, स्वातंत्र्य, बंधुता, न्याय, प्रज्ञा, षील, करुणा, मैत्री या मानवी जीवनमूल्यांनी थेरीगाथाला जागतिक स्वरूप प्राप्त झाले आहे. थेरीगाथाने स्त्रियांच्या मनात करुणेचा बोधिवृक्ष फुलवला आहे. या सगळ्या आशय सौंदर्याने आणि उत्कट अभिव्यक्तीने थेरीगाथा मधून स्त्रीवादी जाणिवा व्यक्त झाल्या आहेत. थेरीगाथा मधून व्यक्त झालेल्या स्त्रीवादी जाणिवांचे अनेक पैलू आधुनिक मराठी कवितेमधून साकारले आहेत हे स्पष्टच आहे.

**निष्कर्ष**

थेरीगाथा मधून व्यक्त झालेला स्त्रीवाद जाणिवा आणि आधुनिक मराठी कवितेतून व्यक्त झालेला स्त्रीवाद याविषयी चिकित्सक अध्ययन केल्यानंतर पुढीलप्रमाणे निष्कर्ष काढले आहेत.

1. 'थेरीगाथा' हा स्त्रीवादी जाणिवांना व्यक्त करणारा जगातील पहिला ग्रंथ असून स्त्रीवादी साहित्याची बीजं थेरीगाथातून अंकुरली आहेत. अर्थात 'थेरीगाथा' हा ग्रंथ स्त्रीवादी साहित्याची प्रेरणा आहे.
2. 'थेरीगाथा' स्त्री अभिव्यक्तीचा आणि स्त्री स्वातंत्र्याचा आद्य हुंकार आहे हे समजून येते.
3. थेरीगाथातून व्यक्त झालेल्या स्त्रीवादी जाणिवांमध्ये आणि आधुनिक स्त्रीवादी कवितेतून व्यक्त झालेल्या स्त्रीवादी जाणिवांमध्ये साम्य असल्याचे दिसून येते.
4. थेरीगाथा स्त्री-पुरूष समानतेचा संदेश देते. त्याप्रमाणे आधुनिक स्त्रीवादी कविता स्त्री-पुरूष समानतेचा सुंदेश देताना दिसून येते.

5. थेरीगाथातील स्त्रियांना सामाजिक परिवर्तनाचा संदेश दिला आहे. त्याप्रमाणे आधुनिक स्त्रीवादी कविता सुद्धा सामाजिक परिवर्तनाचा संदेश देताना दिसून येते.
6. 'थेरीगाथा' ने युगनायिका निर्माण करून स्त्रियांना जगण्याचा नीतीमय संदेश दिला त्याप्रमाणे आधुनिक स्त्रीवादी मराठी कविता देखील नीतीमूल्यांची रूजवन करताना दिसून येते.
7. आशय आणि अभिव्यक्तीच्या दृष्टीने थेरीगाथा वैशिष्ट्यपूर्ण आहे.

**संदर्भ सूची**

1. 1) छत्रे लता दिलीप, बौद्ध धर्मातील स्त्री विचार, सुगावा प्रकाशन, पुणे, व्दितीयावृत्ती, डिसेंबर-2009 पृ. 24.
2. 2) पाटील डा. शोभा, स्त्रीवादी विचार आणि समीक्षेचा मागोवा, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, 19 मार्च 2007. पृ. 21.
3. 3) साखरे डा. सीमा, स्त्रियांच्या न्यायाचा प्रश्न, सीमा प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती 2005, पृ. 77.
4. 4) ढेरे अरूणा, 'कविता' , स्त्री साहित्याचा मागोवा, खंड- 1, संपादक- डाॅ. मंदा खांडगे, डाॅ.
5. लीला दीक्षित, डा. अरूणा ढेरे, विनया खडपेकर, प्रकशक- साहित्यप्रेमी भगिनी मंडळ, पुणे, प्रथमावृत्ती, डिसेंबर 2002, पृ. 49.
6. 5) माळी डा. मा. गो., संपादक- सावित्रीबाई फुले समग्र वाङमय, प्रकाशक, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, पाचवी आवृत्ती, जुलै 2011, पृष्ठ 39.
7. 6) डा. विमलकीर्ति, थेरीगाथा, सम्यक प्रकाशन, नई दिल्ली, चतुर्थ संस्करण, 2011, पृ. 35.
8. 7) तत्रैव, 35.
9. 8) काळे-जाधव डा. सौ. अनिता, ग्रामीण साहित्यातील स्त्री दर्षन, निनाद प्रकाशन, पुणे, पहिली आवृत्ती, 26 जानेवारी 2014, पृ. 300.
10. 9) डा. विमलकीर्ति, थेरीगाथा, उनि. पृ. 189.
11. 10) मनोहर डा. यशवंत, आंबेडकरी मराठी साहित्य, युगसाक्षी प्रकाशन, नागपूर, व्दितीयावृत्ती: पुनर्मुद्रण, 31 मे 2012, पृ. 204.
12. 11) डा. विमलकीर्ति, थेरीगाथा, उनि. पृ. 97.
13. 12) पाटील अनुराधा, दिवसेंदिवस, कुशा प्रकाशन, औरंगाबाद, 1992, पृ. 12-13.
14. 13) डा. विमलकीर्ति, थेरीगाथा, उनि. पृ. 81.
15. 14) ढेरे अरूणा, निरंजन, सुरेश एजन्सी, पुणे, 1994, पृ. 10.
16. 15) उपाध्याय भरत सिंह, थेरीगाथा, गौतम बुक सेंटर, दिल्ली, प्रथम संस्करण 2010, पृ.77.